13 JUN 2025 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिसर जैवविविधतेचे केंद्र

पश्चिम घाटातील १२०० दुर्मिळ वनस्पती उपलब्ध : विद्यापीठ परिसरात मोर, अन्य पक्षी, सरपटणारे : ७० टक्के देशी झाडांची लागवड

जैवविविधता सामुहिकरित्या लुप्त होताना दिसत आहे. त्यामुळे देशभरात पंडा वाढलेले तापमानच जैवविविधता संवर्धनाची गरज असल्याचा ईशारा देत आहे. वाढते तापमान रोखण्यासाठी प्रत्येक मानवाने सामुहिकरित्या झाडे लावून संवर्धन करावीत, असा संदेश केंद्रासह राज्य शासन देत आहे. परंतु शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच ८५६ एकर परिसरात जैवविविधता संवर्धनाचे काम सुरू आहे. विद्यापीठ परिसरात ९० विहरी, २४ तळी असल्याने शिवाजी विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वतंत्र आहे. ३९ अधिविभागात जवळपास २ लाख ५० हजारपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेतात. विद्यापीठ परिसर ऑक्सिजन हब असल्याने शहरातील नागरिकांची पहाटेपासूनच फिरण्यासाठी गर्दी असते. क्रांतीवनात फिरण्यासाठी केलेल्या ट्रॅकचा ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना खूपच फायदा होत आहे. क्रांतीवनातही अनेक प्रकारची फुल आणि देशी वनाची झाडांही आहेत. त्यामुळे हिरव्यागार क्रांतीवनात फिरताना भरपूर ऑक्सिजन मिळतो.

• अहिल्या परकाळे, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ परिसर जैवविविधतेने नटलेला आहे. नाट्य व संगीतशास्त्र अधिविभागानजीकचे तळे. तळ्यात पोहणारे पक्षी. विद्यापीठातील रोपवाटिकेनजीक फुललेले कमळ. (छाया : शशिकांत मोरे)

देशी वनांची लागवड

निसर्गाच्या समतोल राखण्यासाठी वृक्षलागवड करणे महत्वाची आहे, हा संदेश प्राचीन काळापासून दिला जात आहे. या वारसा जपत विद्यापीठ प्रशासनाने विद्यापीठ परिसरात देशी वृक्षांची मोठ्या प्रमाणात लागवड केली आहे. करंजा, सातवान, कडुलिंब, जामुळ, शेवगा, नागचंपा, पारजा, आवळा, उंबर यासह अन्य झाडांची लागवड केली आहे. त्यामुळे विद्यापीठ परिसरात सहाशेच्या ५ टिप्पी वास्तव्य करी आहेत.

शिवाजी विद्यापीठातील बॉटनिकल गार्डनमध्ये पश्चिम घाटातल्या जगभरातील १२०० दुर्मिळ वनस्पतीसह औषधी वनस्पतीचे संवर्धन केले आहे. देशभरातील निसर्गाच्या संवर्धनासाठी शिवाजी विद्यापीठातील बॉटनिकल गार्डन आहे. या गार्डनची देखभाल दुरुस्ती विद्यापीठ प्रशासन स्वनिधीतून करून जैवविविधतेचे संवर्धन करीत आहे. देशभरातील ३० टक्के वनस्पती या गार्डनमध्ये असल्याने दरवर्षी हजारो विद्यार्थी या गार्डनला भेट देतात. भारतात अनेक वनस्पतीच्या रूपाने नैसर्गिक समृध्दी आहे. मिळेल्या जमातील हीच समृध्दी नष्ट होत असल्याने वातावरणातील बदल आणि वाढते तापमान पाहून भारत व राज्य शासनाने जैवविविधता संवर्धनाची मोहिम हाती घेतली. शिवाजी विद्यापीठातील साडेआठ एकर परिसरात गेल्या ६१ वर्षांपासून दुर्मिळ वनस्पतीचे संवर्धन केले जात आहे. एवढेच नाही तर वनस्पतीशास्त्र विभागातील नीट बॉटनिकल गार्डनमध्ये तब्बल बारशे वनस्पतीसह दुर्मिळ औषधी वनस्पतीचे संवर्धन केले असून, यामध्ये दिवसेदिवस घट पडत आहे. विद्यापीठ परिसरातील वनस्पती पाहून निसर्गप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फिटते. ९०५ प्रकारची देशी-विदेशी वनांची झाडे पहावयास मिळतात. तर वर्षभरात ५२५ प्रकारच्या पक्षांचे विद्यापीठात दर्शन होते. तसेच ५ हजार ५०० मोर असून साप, खवल्या मांजर, साळींदर, बेडकांच्या अनेक प्रजातीही निदर्शनास येतात. विद्यापीठात आलेला व्यक्ती येथील सौंदर्य पाहून थोडा वेळ विसाव्याशिवाय राहात नाही. ही जैवविविधता पहण्यासाठी शाळा-महाविद्यालयाच्या सहलीदरम्यान विद्यापीठात येतात. संख्या वाढत पडल्याने विद्यापीठ परिसर हिरवागार झाला असून रहिवासी पुणे शहरातला दिसतात. येथील निसर्ग विद्यार्थ्यांसह नागरिकांचे मन प्रसन्न करणारा आहे. शिवाजी विद्यापीठात स्थानिक झाडांची लागवड करून ठेवली

तळ्यात बाटल्या, चपलांसह अन्य साहित्य

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागानजीक तळ्यात किरायला येणाऱ्या लोकांनी प्लॉस्टिकच्या बाटल्या, चपलांसह अन्य साहित्य टाकल्या आहेत. तसेच येथील झाडाच्या मोठ्या फांद्या तळ्यात पडल्याने कुजलेली लाकडही पाहावयास मिळतात. त्यामुळे पाणी दूषित होण्यास मदत होत आहे.

झाडे जगण्याचा प्रयत्न आहे. त्यामुळे येथे पक्षी प्राणी राहतील. झाडा वाढावी म्हणून जतनाचाच कार्य सुरू असून सकारात्मक बदल दिसत आहे.

प्रत्येक खेळाचे क्रीडांगण

शिवाजी विद्यापीठ परिसरात सर्व प्रकारच्या खेळाच्या मैदानासह सिंथेटिक ट्रॅक, कुस्ती मल्लखांब, क्रीडा वसतिगृह आहे. त्यामुळे दररोज सकाळी सर्व प्रकारच्या खेळाचा सराव करताना खेळाडू दिसतात. विद्यापीठात आता स्वतंत्र क्रीडा विभाग सुरू झाल्याने खेळाडूंची संख्या वाढत आहे. तसेच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळाडूंनी शिवाजी विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. मध्या खेळाची मैदान नागरिकांनी खेळाडूंची गैरसोय होत असल्याच्या तक्रारी आहेत.

सुशोभीकरणासह कचरा पेटीची दयनीय अवस्था

विद्यापीठातील इमारतीच्या बाजूला आणि ओपन जिम परिसरात सुशोभीकरण केले आहे. मध्या येथील फुलझाडांची वाढ झाली आहे. त्यावर प्रचंड गवत वाढले आहे. तसेच ओपन जिम परिसरात काही ठिकाणी कचराकुंडी बागची व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांकडून होत आहे. पाच परिसरात कचरा पेटी ठेवली असून या कचरा पेटीची दयनीय अवस्था आहे. विद्यार्थ्यांसह फिरायला येणाऱ्या नागरिकांनी कचराकुंडीच्या खाली कचरा टाकल्याने येथे दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे.

मुख्य इमारतीसमोरील रस्त्याचे चालण

शिवाजी विद्यापीठातील मुख्य इमारतीसमोरील गार्डनमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसण्यासाठी लाखो लोक येतात. परंतु याच गार्डन परिसरातील रस्त्याची चालण खराब असल्याने विद्यार्थ्यांसह नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. विद्यापीठ अंतर्गत रस्त्याचे काम युध्दपातळीवर घेतल्याने रस्ते चांगले आहेत. परंतु विद्यापीठाचे मुख्य आकर्षण असलेला परिसरातच रस्ते उकरलेले आहेत. या रस्त्याची दुरुस्ती कधी होणार याकडे विद्यापीठ पर्यटकांचे लक्ष लागले आहे.

विद्यापीठातील संबंधीत दुर्मिळ वनस्पती

• तमिळनाडूतील वनस्पती ब्रायोफायलम सिलिकोलिटम	१
• विदर्भ-मराठवाड्यातील प्रजाती	६५
• महाराष्ट्रातील प्रजाती	२५
• कोकणातील प्रजाती	२५
• नाशिकच्या प्रजाती	६५
• सह्याद्रीतील प्रजाती	२५
• भारतातील केवळ प्रजाती	१२
• महाराष्ट्र नष्ट प्रजाती	४१५

विद्यापीठ परिसरातील संपदा

अधिविभाग	३९	पक्षी	५२५ प्रकारचे
विहरी	९०	फुलपाखरू	५६ प्रकारची
तळी	२४	मोर	१५००

झाडे : ९०५ प्रकारची

तरुण भारत ग्राऊंड रिपोर्ट